


दैनिक
निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३१० वा    सोमवार दि ०२ मार्च २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# आम्ही हिंदी सक्तीचा अहवाल स्वीकारला पण अंमलबजावणी केली नाही, उद्धव ठाकरेंचा खुलासा...

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी शिक्षणाच्या सक्तीच्या निर्णयाला मनसे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांनी प्रचंड विरोध केला. या दोन्ही पक्षांसह महाविकास आघाडीच्या इतर घटक पक्षांनीदेखील या निर्णयाला विरोध केला होता. सरकारच्या त्रिभाषिक धोरणाविरोधात विरोधी पक्ष एकटला होता. त्यामुळे महायुती सरकारला या प्रकरणात बॅकफूटला जावं लागलं होतं. इयत्ता पहिलीपासून शाळेत हिंदी भाषेची सक्ती करावी का? याबाबत अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली होती. पण या मुद्द्यावर पुन्हा राजकारण तापताना दिसत आहे. कारण हिंदी सक्तीचा अहवाल ठाकरे सरकारने स्वीकारला होता, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात अर्थसंकल्पीय अधिवेशनात म्हणाले. त्यावर आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. यावेळी त्यांनी आपल्या सरकारने अहवाल स्वीकारल्याचं उद्धव ठाकरेंनी मान्य केलं. पण अंमलबजावणी करावी की नाही यासाठी कमिटी नेमली होती. त्या कमिटीची बैठकच कधी झाली नव्हती, असंही ठाकरेंनी स्पष्ट केलं. मला एका गोष्टीचं समाधान आहे, म्हटलं तर अभिमान सुद्धा आहे की, मी मुख्यमंत्री असताना राज्यात मराठी भाषा सक्तीची केली. त्याचबरोबर वैषम्य देखील वाटतं की, महाराष्ट्रात मराठी सक्तीचा निर्णय घ्यावा लागतो. याचा मला खेद सुद्धा आहे. सक्ती कशाला पाहिजे? महाराष्ट्र म्हटल्यावर मराठीच पाहिजे. पण ते मी केलं. त्यानंतर काल पुन्हा... ह्यांची सवय काय तर जुनं दळण दळत बसायचं. एवढं दळायचं की, लोकं शेवटी ते खरं मानायला लागतात, असं उद्धव ठाकरे म्हणाले. हिंदीची सक्तीसाठी कमिटी नेमली होती. तो अहवाल कमिटीने दिला. तो अहवाल सरकारने घेतला. आता तो अहवाल स्वीकारल्यानंतर अंमलबजावणी करायची की नाही? त्या अनुषंगाने कमिटी नेमली होती. त्या कमिटीची बैठकच झाली नाही. कारण त्याआधी तुम्ही सुरत-गुवाहाटी अशी यात्रा काढली. त्याच्यात सरकार पाडलं. त्यामुळे कमिटीची बैठक झाली नाही. तो निर्णय आम्ही घेतला म्हणून तुम्ही लादणार होता तर असे आम्ही अनेक निर्णय घेतले ते तुम्ही का रद्द केले, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. ङ्गङ्घमराठी भाषा भवन अजूनही उभे राहत नाही. महाराष्ट्र आणि बंगाल यांना रंगभूमीची पार्श्वभूमी आहे. या इकडे चौपाटीला मी मराठी रंगभूमीची वाटचाल सांगणारं दालन उभं करणार होतो.



पण तो निर्णय रद्द केला आणि बिल्डरच्या घशात घातलं. तुम्ही तो निर्णय का अंमलात आणला नाही? मराठी भाषा भवन अजून पडून राहिलेलं आहे. भाजपचं ऑफिस उभं राहतंय ते सुद्धा असंच भुखंड ढापून. म्हणजे तुमच्या पक्षाची कार्यालये उभे करत आहात आणि माझ्या मातृभाषेचं भवन बांधायला तुम्हाला मुहूर्त शोधावा लागतोय? कसले तुम्ही मुख्यमंत्री? कोणत्या राज्याचे तुम्ही मुख्यमंत्री?, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

# अजितदादांचं विमान जमिनीवर आदळताच पायलटचे शेवटचे शब्द काय?

वृत्तसंस्था/मुंबई

दृश्यमानता प्रमाणापेक्षा खूपच कमी असल्यामुळे बारामती विमानतळावर उतरण्यापूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला, असा प्राथमिक निष्कर्ष हवाई अपघातांचा तपास करणाऱ्या संस्थेने (एएआयबी) काढला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीला अपघात झाला. या दुर्घटनेत पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचा तपास ङ्गएएआयबीफ्कडे सोपवण्यात आला होता. अपघाताला एक महिना पूर्ण होत असतानाच शनिवारी या संस्थेने प्राथमिक तपास अहवाल जाहीर केला. बारामती येथे धावपट्टीवरील फिकट होत चाललेल्या खुणा आणि धावपट्टीच्या पृष्ठभागावर सैल खडी याकडे बोट दाखवताना ङ्गएएआयबीफ्ने नियंत्रण नसलेल्या विमानतळांवर उड्डाणे करणाऱ्या सर्व ऑपरेटरना निर्धारित मानक कार्यपद्धतींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) जारी करावेत, अशी शिफारस केली आहे. एएआयबीफ्ने २२ पानांच्या अहवालात म्हटले आहे, विमानतळाकडे येताना वैमानिकांनी दृश्यमानतेविषयी विचारले होते. त्यावेळी नियंत्रण कक्षाकडून ३००० मीटर असल्याचे उत्तर मिळाले. लॅण्डिंगला परवानगी देताना हवा साधारण असल्याचे नियंत्रण कक्षाने म्हटले होते. मात्र, व्हीएफआर विमानासाठी दृश्यमानता प्रमाणापेक्षा कमी होती. बारामती विमानतळाच्या धावपट्टीच्या डाव्या बाजूला विमान जमिनीवर आदळले. त्यावेळी वैमानिकांचे अखेरचे शब्द ङ्गओह . ओह असे होतेफ अमेरिकेच्या नॅशनल ट्रान्सपोर्ट सेफ्टी बोर्ड (एनटीएसबी) यांच्या सहकार्याने विमानातील सॉलिड स्टेट कॉकपीट व्हॉइस रेकॉर्डर (एसएससीव्हीआर) डाऊनलोड केला जाईल. सॉलिड स्टेट फ्लाइट डेटा रेकॉर्डरमधील (एसएसएफडीआर) डेटा डाऊनलोड करण्यात आला असून त्याचे विश्लेषण सुरू असल्याचे ङ्गएएआयबीनेफस्पष्ट केले आहे. ङ्गतपासाच्या कोणत्याही टप्प्यावर जेव्हा विमान वाहतूक सुरक्षितता वाढविण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना त्वरित करणे आवश्यक आहे असे वाटेल तेव्हा ते सुरक्षा शिफारशी जारी करू शकतातफ, असे एएआयबीने म्हटले आहे. दोन्ही वैमानिकांनी या आधीही बारामती विमानतळापर्यंत प्रवास



केला होता. त्यामुळे त्यांना परिसराची, विमानतळाची माहिती होती.
- दोन्ही वैमानिकांनी याआधी अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी वैमानिक म्हणून भूमिका पार पाडली होती. यामध्ये इतर अनियंत्रित विमानतळांचा समावेश होता. तसेच बारामतीचाही समावेश होता.
- विमानतळावर विंडसॉकशिवाय दिशादर्शनासाठी सुविधा उपलब्ध नाही. या धावपट्टीवर दोन विंडसॉक असून दोन्ही विंडसॉक रनवे २९ च्या बाजूला आहेत. ११ च्या दिशेला एकही विंडसॉक नाही.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रोख ते रोखठोक!




गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये, भारतात डिजिटल व्यवहार प्रणालीचा मोठ्या प्रमाणात स्वीकार झालेला दिसून येतो. डिजिटल व्यवहार म्हणजे रोख रकमेचा (ङ्गनोटा किंवा नाणीफ यांचा) वापर न करता, इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे, जसे की मोबाइल, कम्प्युटर किंवा इंटरनेटच्या मदतीने पैशांचे हस्तांतरण करणे. या व्यवहारांत यूपीआय, नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्डस्, डिजिटल वॉलेट्स इत्यादींचा समावेश होतो. या व्यवहारांचा मोठा फायदा म्हणजे ते त्वरित व सुरक्षितपणे पूर्ण करता येतात. पिन, ओटीपी आणि एंक्रिप्शन तंत्रज्ञानामुळे हे व्यवहार सुरक्षित असतात. गेल्या काही वर्षांत, विशेषतः करोना साथीच्या काळापासून आपल्या देशात या डिजिटल व्यवहारांत झपाट्याने वाढ झाली. फक्त शहरांमधूनच नव्हे तर अगदी ग्रामीण भागातही आज अनेक किरकोळ (रिटेल) व्यवहार या डिजिटल माध्यमांद्वारे होताना दिसतात. रिक्षावाल्यांना वा भाजी-फळे विकणाऱ्यांना पैसे देणे असो, की मोठाल्या मॉल्समधून खरेदी करणे असो की विजेची, गॅसची बिले देणे असो, आज अनेकांची प्रथम पसंती डिजिटल पेमेंटलाच दिसून येते. भारतीय रिझर्व्ह बँक दर सहा महिन्यांनी, भारतासाठी डिजिटल पेमेंट निर्देशांक प्रसिद्ध करते. १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या निर्देशांकाचे सप्टेंबर, २०२५ मधील मूल्य ५१६.७६ एवढे होते, जे मार्च, २०१८ मध्ये १०० होते. म्हणजेच गेल्या सात-आठ वर्षांत डिजिटल व्यवहारांचे प्रमाण पाच पटीहून अधिक वाढलेले आहे. आता या वेगाने एखाद्या देशातील डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढत असेल, तर तेथील रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण लक्षणीय पद्धतीने कमी व्हायला पाहिजे, अशी सर्वसामान्यपणे अपेक्षा असते. पण तसे होताना दिसत नाही आहे. रिझर्व्ह बँकेच्या डेटाप्रमाणे, भारतीय अर्थव्यवस्थेतील ङ्गप्रचलित चलनफ (करन्सी इन सर्क्युलेशन), जानेवारी ३१, २०२६ पर्यंत रु. ४० लाख कोटी एवढे (गेल्या वर्षीच्या तुलनेत ११ टक्क्यांनी) वाढले आहे. या ङ्गप्रचलित चलनाफ्तील वाढ २०२१-२२ मध्ये ९.८१ टक्के होती, जी २०२२-२३ मध्ये ७.८१ टक्के झाली व २०२३-२४ मध्ये ३.९३ टक्केपर्यंत घसरली. मात्र २०२४-२५ पासून ङ्गप्रचलित चलनाफ्तील वाढीने पुन्हा जोम धरला असून, ही वाढ २०२४-२५ मध्ये ६.०७ टक्के झाली, तर चालू वित्तीय वर्षात (२०२५-२६ मध्ये), जानेवारीपर्यंत ही वाढ तब्बल ११ टक्के इतकी झाली. केअर एड्ज रेटिंगफ या रेटिंग एजन्सीच्या अहवालाप्रमाणे २०२५-२६ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या तिमाहीत खासगी क्षेत्राच्या एकूण खर्चातील रोखीच्या व्यवहारांचे प्रमाण तब्बल ५० टक्के इतके वाढलेले होते. आता आपल्या देशात ही उलटी गंगा कशामुळे वाहू लागली आहे, ते समजून घेणे गरजेचे आहे.

१) ग्रामीण भागांची आर्थिक वाढ : गेल्या दोन वर्षांत पाऊसपाणी व पिके चांगली झाल्यामुळे, ग्रामीण भागांतील उत्पन्ने व खर्च तुलनेने वाढले आहेत. अजूनही निम्न-शहरी व ग्रामीण भागांत रोखीचे व्यवहार बऱ्यापैकी प्रचलित आहेत. पैशांची प्रत्यक्ष देवाण-घेवाण करणे ग्रामीण नागरिकांना अधिक सोयीचे व सुरक्षित वाटते. या भागांतील डिजिटल सुविधांचा तुटवडा व कमी प्रमाणातील आर्थिक साक्षरता यास कारणीभूत असू शकतात. तसेच अनेक शेतकरी हे व्यापाऱ्यांकडून रोख पैसे घेण्यास प्राधान्य देतात; कारण बऱ्याच वेळा त्यांनी सावकार/ दलालांकडून जी कर्जे घेतली असतात ती रोख स्वरूपात असतात. यांमुळेच आज अनेक बँका ग्रामीण भागांत नवनवीन एटीएम मशीन्स उघडत आहेत. गेल्या दोन वर्षांत ग्रामीण भागांमध्ये एटीएम मशीन्समधून पैसे काढण्याचे प्रमाण जबरदस्त वाढले आहे, जे तिथली आर्थिक परिस्थिती तुलनेने सुधारल्याचे लक्षण असू शकते. पण याचा परिणाम अर्थव्यवस्थेमधील रोखीचे व्यवहार वाढण्यावर झाला आहे.

२) व्याज-दरांतील घसरण : २०२५-२६ या वित्तीय वर्षांत, जलद वेगाने घसरलेल्या व्याजदरांमुळे, कमी उत्पन्न असलेल्या अनेक लोकांनी, आपल्या मिळकतीचे पैसे बँकांमध्ये न ठेवता, स्वत:सोबत रोखीच्या स्वरूपात ठेवणे सुरू केले आहे. जर व्याजातून मिळणारे पैसे विशेष नसतील तर बँकेत का ठेवा, असा विचार करून अनेकांनी नगदी पैसे जवळ ठेवण्यास सुरुवात केली आहे. अडीअडचणीला लगेच वापरता येतील, अशी सोय त्यात बघितली जाते. गेल्या एक-दोन वर्षांत याचा परिणाम बँकांमधील ठेवींची वाढ मंद होण्यावर झालेला दिसून आला आहे. यामुळे अर्थव्यवस्थेतील प्रचलित चलन मात्र वाढलेले दिसते.

३) जमीन/इमारतींच्या व्यवहारातील वाढ : अजूनही अशी काही क्षेत्रे आहेत जिथे ङ्गऔपचारिकीकरणफ (फॉर्मलायझेशन) पुरेशा प्रमाणात झालेले नाही. उदाहरणार्थ, जमीन व इमारतींचे व्यवहार. विशेषतः जमिनी वा इमारतींच्या दुय्यम विक्री/ खरेदी नोंदणी व्यवहारांमध्ये, मत्तेच्या किंमती प्रत्यक्षापेक्षा कमी दाखविल्या जातात व उर्वरीत रक्कम मोठ्या प्रमाणात रोखीच्या स्वरूपात दिली जाते. अनेकवेळा हे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षाही अधिक असते. हे असे ङ्गकाळेफ पैसे अर्थव्यवस्थेतील ङ्गप्रचलित चलनफ वाढवत असतात. सध्या झपाट्याने वाढलेले ङ्गप्रचलित चलनफ हे अर्थव्यवस्थेतील ङ्गजमिनी व इमारतींचे दुय्यम व्यवहारफ वाढल्याचे लक्षण मानता येऊ शकते. गेल्या एक-दोन वर्षांत जीएसटीचे अनुपालन () सुधारावे म्हणून अनेक राज्यांमधून लघु उद्योजकांना, विक्रेत्यांना तसेच पुरवठादारांना नोटिसा पाठविण्यात आल्या. कारण या उद्योजकांनी/व्यापाऱ्यांनी यूपीआय वापरून जो व्यवसाय केला होता, त्यामुळे त्यांनी व्यवसायातून कमाविलेल्या उत्पन्नाचे अचूक मोजमाप करणे शक्य झाले. ङ्गजीएसटीफच्या कचाट्यात न अडकण्यासाठी पुन्हा या उद्योजकांनी यूपीआय वापरणे सोडून, रोखीच्या व्यवहारांना स्वीकारले आहे. याचा अनुभव आपण सगळेच सतत घेत असतो. जसजसे जीएसटीचे अनुपालन सुधारण्याचे प्रयत्न जोमाने सुरू झाले तसतसे अनेक छोट्या-मोठ्या उद्योजकांनी ङ्गकच्ची पावतीफ देऊन नगदी पैशांत वस्तू विकणे पुन्हा सुरू केले आहे. यातून देखील ङ्गप्रचलित चलनफ वाढण्यास मदत होते आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# अपघातावरून आरोप करणाऱ्या रोहित पवारांवर तटकरेंचा पलटवार; जुनी घटना सांगत गंभीर आरोप

**बारामती :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्यात राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडाला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवारांचा अपघात झाला नसून घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला. तसंच त्यांनी नाव न घेता अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांवरही निशाणा साधला होता. या पार्श्वभूमीवर आज बारामती इथं पत्रकारांशी बोलताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी जोरदार पलटवार केला असून २०१९ मध्ये कोण भाजपकडे तिकीट मागायला गेले होते, हे आम्हाला माहीत आहे, असं म्हणत नाव न घेता रोहित पवारांना फटकारलं आहे. सुनील तटकरे म्हणाले की, 'टीका टिप्पणी होत असते. यापूर्वी दादांबद्दल कोण काय बोलले आहे, हे सर्वांना माहिती आहे. जनसन्मान यात्रेनिमित्त स्वत: अजितदादा





बारामतीतच म्हणाले होते की, मी कुटुंबात एकटा पडलो आहे. २०१९ ला कोण भाजपकडे तिकीट मागायला गेले होते, हे मला आणि दादांना माहिती होतं. त्यामुळे कोण काय बोलतंय, याबद्दल मला काही वाटत नाही,' अशा शब्दांत तटकरे यांनी रोहित पवारांना प्रत्युत्तर दिलं आहे.अजितदादांचा आणि माझा ४० वर्षांचा प्रवास आहे. त्यांच्या अनेक गोष्टींचा मी साक्षीदार आहे. त्यामुळे कोण काय बोलतं याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. कोणालाही काही आरोप करायचे असतील तर त्यांनी स्पष्टपणे नाव घेऊन बोलावे. जो कोणी बोलतो, त्याने नाव घेऊन बोलावे. अस्पष्ट विधानांचा काही उपयोग नाही,' असा टोलाही सुनील तटकरे यांनी लगावला आहे.सुरुवातीपासून राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका आहे की, विमान अपघाताबाबत चौकशी व्हावी. केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री यांनीही चौकशीचे आदेश दिले आणि त्याची चौकशी सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली आम्ही मुख्यमंत्र्यांना भेटलो आणि पक्षाच्या वतीने निवेदन देत चौकशी व्हावी अशी मागणी केली. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे देखील चौकशीची मागणी केली असून सीबीआयद्वारे चौकशी सुरू आहे. दादांबद्दल सर्वांनाच हळहळ वाटत आहे. त्यामुळे लवकरात लवकर घटनेचा तपास लागावा, ही सर्वांची मागणी आहे,' असं तटकरे म्हणाले.सुनील तटकरे म्हणाले की, 'टीका टिप्पणी होत असते. यापूर्वी दादांबद्दल कोण काय बोलले आहे, हे सर्वांना माहिती आहे. जनसन्मान यात्रेनिमित्त स्वत: अजितदादा बारामतीतच म्हणाले होते की, मी कुटुंबात एकटा पडलो आहे. २०१९ ला कोण भाजपकडे तिकीट मागायला गेले होते, हे मला आणि दादांना माहिती होतं. त्यामुळे कोण काय बोलतंय, याबद्दल मला काही वाटत नाही,' अशा शब्दांत तटकरे यांनी रोहित पवारांना प्रत्युत्तर दिलं आहे.अजितदादांचा आणि माझा ४० वर्षांचा प्रवास आहे. त्यांच्या अनेक गोष्टींचा मी साक्षीदार आहे. त्यामुळे कोण काय बोलतं याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. कोणालाही काही आरोप करायचे असतील तर त्यांनी स्पष्टपणे नाव घेऊन बोलावे. जो कोणी बोलतो, त्याने नाव घेऊन बोलावे. अस्पष्ट विधानांचा काही उपयोग नाही,' असा टोलाही सुनील तटकरे यांनी लगावला आहे.सुरुवातीपासून राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका आहे की, विमान अपघाताबाबत चौकशी व्हावी. केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री यांनीही चौकशीचे आदेश दिले आणि त्याची चौकशी सुरू झाली आहे.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे ठप्प; मुख्यमंत्र्यांकडून अधिकाऱ्यांना सूचना

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर काही दिवसांपूर्वी झालेल्या टँकर अपघाताचे पडसाद शनिवारी विधानसभेत उमटले. याची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महामार्गावर अशा प्रकारच्या ज्वलनशील पदार्थांची वाहतूक करणाऱ्या टँकरचा अपघात झाल्यास पुढे कोणती कार्यवाही करायची, यासंदर्भात मानक प्रणाली (एसओपी) तयार करण्याची सूचना संबंधित कंपन्यांना दिल्याची माहिती दिली.मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर काही दिवसांपूर्वी प्रोपेलिन या ज्वलनशील वायूचा टँकर उलटल्याने जवळपास ३२ तास महामार्ग ठप्प होता. याबाबत आमदार चेतन तुपे, अमित साटम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरील माहिती दिली. यावेळी शिवसेना (उबाठा) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी हॅजमॅट व्हेईकल (धोकादायक पदार्थांची वाहतूक करणारे वाहन) युनिट तसेच बोगद्यात आग लागल्यास अग्निशमन युनिट उभारण्याची मागणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जयंत पाटील यांनी अशा परिस्थितीत पोलिस किंवा संबंधित यंत्रणेला घटनास्थळी पोहोचण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करणे तसेच प्रवाशांना थेट माहिती पोहोचविण्याची मागणी केली.दरम्यान, भविष्यात अशा प्रकारच्या अपघातानंतर संबंधित टँकरला एअरलिफ्ट करता येऊ शकते का, याची चाचणी एमएसआरडीसीच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले.अशा प्रकारची वाहतूक करणाऱ्या कंपन्यांकडे अशा स्थितीत मदत करण्याची यंत्रे नव्हती आणि एसओपीही नाही. त्यामुळे तशी एसओपी तयार करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच अशा परिस्थितीत आपण हेलिकॉप्टर वापरतो पण सूर्यास्तानंतर आपल्याकडे हेलिकॉप्टर वापरता येत नाहीत त्यामुळे त्यांच्या वापरावर मर्यादा आहेत.

## रोहित सिंह यांना अटक करण्याची जय पवारांची मागणी

**पुणे :** व्हीएसआर कंपनीचे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर विमान उड्डाणादरम्यान झोपलेले दिसत आहेत, या निष्काळजी प्रकरणी त्यांना अटक करा, असं लिहित दिवंगत नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे सुपुत्र जय पवार यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. माझ्या वडिलांना आपण गमावलंच, आता एका मुलाची आर्त हाक आहे, असं सांगत जय पवार यांनी डीजीसीएकडे कारवाईची मागणी केली आहे. हा व्हिडिओ नेमका कधीचा आहे, हे जय पवार यांनी स्पष्ट केलेलं नाही.माझ्या वडिलांना आपण गमावलं, ही वेदना आयुष्यभर साथ देणार आहे. या व्हिडिओमध्ये व्हीएसआर कंपनीचे मालक रोहित सिंह हे मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले दिसत आहेत. आकाशात असताना असा निष्काळजीपणा असू शकत नाही. हे अत्यंत गंभीर आणि धक्कादायक आहे' असं जय पवार यांनी लिहिलं आहे.

## रातोरात पायउतार झालेल्या उपराष्ट्रपति धनखडांनी स्वत:चाच दावा खोडला

**नवी दिल्ली :** 'उपराष्ट्रपतिपदाचा राजीनामा मी आजारपणामुळे दिलाच नव्हता', असा दावा या पदावरून रातोरात पायउतार झालेले जगदीप धनखड यांनी नुकताच केला आहे. धनखड यांच्या तडकाफडकी राजीनाम्याबाबत राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सातत्याने प्रश्न उपस्थित केले होते.आपण राजीनामा देण्याचे पाऊल प्रकृती अस्वास्थ्यामुळे उचलले नव्हते, असे सांगताना जगदीप धनखड यांनी गेल्या वर्षी जुलैमध्ये राष्ट्रपतींना पाठविलेल्या स्वत:च्याच राजीनामापत्रातील दावाही एकप्रकारे खोडून काढला आहे. संसदेच्या मागील पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, म्हणजे २१ जुलै २०२५ रोजी राष्ट्रपतींना पाठवलेल्या पत्रात धनखड यांनी लिहिले होते की, आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी आणि वैद्यकीय सल्ल्याचे पालन करण्यासाठी आपण पदाचा राजीनामा देत आहे. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल व राष्ट्रीय



लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतिपदी निवड करण्यात आली.राजीनामा दिल्यावर धनखड यांनी अज्ञातवास व मौन बाळगले होते, ते त्यांनी प्रथमच सोडले आहे. राजस्थानातील चुरू येथे एका मेळाव्याला संबोधित करताना त्यांनी आपल्या राजीनाम्याबाबत प्रथमच जाहीर भाष्य केले. चुरूचे सध्याचे काँग्रेस खासदार राहुल कासवान यांचे वडील व माजी खासदार रामसिंह कासवान व माजी काँग्रेस आमदार कृष्णा पूनिया यांनी या मेळाव्याचे आयोजन केले होते.

## राज्यसभेच्या सातही जागांवर उमेदवार उतरवा, अमित शाहांच्या थेट सूचना

**मुंबई :** महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी होणाऱ्या निवडणुकीत, सर्वाधिक तीन ते चार जागा जिंकण्याइतके आमदार संख्याबळ असलेल्या भाजपकडून केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या व्यतिरिक्त आश्चर्याचा धक्का देणारी नावे जाहीर होऊ शकतात. यात एका अमराठी नेत्याच्या नावाचीही चर्चा आहे. विरोधकांच्या महाविकास आघाडीत उमेदवारीवरून झालेले वाद पाहता, पहिल्या टप्प्यात सहा जागांवर विजयाची खात्री असलेली सत्ताधारी महायुती ऐन वेळी सातव्या जागेसाठीही उमेदवार उतरवण्याची शक्यता आहे.राज्यसभेसाठी भाजपकडून चार उमेदवारांची नावे ठरवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी राज्य सुकाणू समितीची नुकतीच बैठक झाली. त्यात निश्चित



झालेल्या नावांबाबत भाजपाध्यक्ष नितीन नवीन यांच्याशी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व राज्यातील नेते चर्चा करण्याची शक्यता आहे. येत्या एक-दोन दिवसांत भाजपचे राज्यातील उमेदवार जाहीर होऊ शकतात. परराष्ट्रमंत्री एस जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, आठवले या वरिष्ठ मंत्र्यांचे अपवाद वगळता भाजप राज्यसभेसाठी एका नेत्याला दुसऱ्यांदा संधी देत नाही. किंबहुना महाराष्ट्र, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशासारख्या राज्यांबाबत पक्षाने धोरण म्हणूनच तसे ठरविल्याचे पूर्वीची उदाहरणे सांगतात. माजी अर्थ राज्यमंत्री भागवत कराड याला अपवाद ठरणार का, असा प्रश्न यावेळी आहे. कराड, रावसाहेब दानवे व धैर्यशील पाटील यांना राज्यात काम करण्यास सांगितले जाऊ शकते, असे सूत्रांनी सांगितले.भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे व राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांचीही नावे चर्चेत आहेत. तावडे स्वत: महाराष्ट्रातून राज्यसभेवर येण्यास कितपत उत्सुक आहेत, हाही प्रश्न कायम आहे. भाजप उमेदवारांची नावे वरिष्ठ पातळीवर निश्चित झाल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले. यात एका अमराठी नेत्याचेही नाव असल्याची चर्चा आहे.राज्यसभेच्या सात जागांपैकी भाजप चार, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एक व शिवसेना एक असे सूत्र महायुतीत निश्चित झाले आहे. सातव्या जागेसाठी मविआमधील वाद कायम असताना, या जागेवरही उमेदवार उतरविण्याची सूचना थेट गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून आल्याचे समजते. भाजपला सातवा उमेदवार निवडून आणायचा असेल, तर २० मते अतिरिक्त आणावी लागतील व ते साध्य करण्याची तयारी महायुतीने केल्याचे समजते.महाविकास आघाडीचा एक उमेदवार जिंकायचा असेल, तर तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन एक उमेदवार देण्याचा पर्याय प्रत्यक्षात येण्याची चिन्हे नसल्याचे भाजप सूत्रांना वाटते. काँग्रेस आणि उबाठा शिवसेना पक्ष हे दोन पक्ष एकत्र आले, तरी त्यांच्याकडे काठावरच्या बहुमतासाठीची ३६ मते होतात.राज्यसभेची निवडणूक काही दिवसांवर आल्यामुळे आता राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी भाजप या निवडणुका अत्यंत चुरशीने लढवत असल्याने त्या रंगतदार होतात.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुरक्षा रक्षकांनी तरुणासोबत नको ते केलं, संशयातून अनोळखी तरुणाचा जीव घेतला, चौघांना बेड्या

**छत्रपती संभाजीनगर :** रेल्वे स्टेशन एमआयडीसी परिसरातील हमालवाडा येथे काही दिवसांपूर्वी घडलेल्या एका गूढ मृत्यूचा सातारा पोलिसांनी अत्यंत कौशल्याने उलगडा केला आहे. मराठवाडा स्पन पाईप कंपनीत १८ फेब्रुवारी रोजी एका अनोळखी तरुणाचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला होता. सुरुवातीला हा मृत्यू नैसर्गिक वाटत असला तरी, वैद्यकीय अहवाल आणि पोलिसांनी केलेल्या सखोल चौकशीत हा प्रकार थंड डोक्याने केलेला खून असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी कंपनीच्या चार सुरक्षा रक्षकांना बेड्या ठोकल्या आहेत.ऋषिकेश बबन वक्ते (वय २५ वर्षे), रोहित संतोष नगराळे (वय १९ वर्षे), चंद्रकांत भाऊसाहेब मारकळ (वय २१ वर्षे), राहुल बाबूराव दुतोंडे (वय २४ वर्षे), सर्व राहणार खंडोबा मंदिराजवळ, सातारा, अशी आरोपींची नावे आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी सुरक्षा रक्षक राहुल दुतोंडे हा कंपनीत कर्तव्यावर असताना त्याला वायर




चोरी करण्यासाठी एक अज्ञात तरुण आल्याचा संशय आला. त्याने तात्काळ आपले इतर साथीदार ऋषिकेश वक्ते, रोहित नगराळे आणि चंद्रकांत मारकळ यांना बोलावून घेतले. या चौघांनी मिळून त्या तरुणाला पकडले आणि चोरीच्या संशयावरून त्याला टणक तसेच बोथट शस्त्रांनी बेदम मारहाण केली. ही मारहाण इतकी अमानुष होती की त्या अज्ञात तरुणाचा जागीच मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच सातारा पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन घाटी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला होता. प्राथमिक अहवालात शरीरावर मारहाणीच्या जखमा असल्याचे स्पष्ट झाले.सहाय्यक निरीक्षक शैलेश देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी सुरक्षा रक्षकांना ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.पोलिसांनी तातडीने या चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून, न्यायालयाने आरोपींना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.घटनेला दहा दिवस उलटून गेले असूनही मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. तो तरुण नक्की कोण होता आणि तो कंपनीत कोणत्या उद्देशाने आला होता, याचा तपास पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेमुळे औद्योगिक वसाहतीतील सुरक्षा रक्षकांच्या वर्तणुकीवर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## ज्येष्ठाची पावणेअकरा कोटींची फसवणूक, एटीएमला गेले अन अडकले

**पुणे :** 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवून शहरातील एका ज्येष्ठ नागरिकाची पावणेअकरा कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या सायबर चोरट्यांना सायबर गुन्हे शाखेने अटक केली आहे. हर्षद सुभाष धनतोले (वय २३) आणि समर्थ सुरेश देशमुख अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी धनतोले आणि देशमुख यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइलवर संपर्क साधून स्वतःला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाचे (सीबीआय) अधिकारी असल्याचे भासवले. काळ्या पैशांच्या व्यवहारात संबंधित ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्याचा वापर झाल्याचा आरोप करून त्यांना 'डिजिटल अरेस्ट' करण्यात येणार असल्याची भीती दाखवली; तसेच या प्रकरणात कुटुंबीयांनाही अटक होऊ शकते, असे सांगून दिलेल्या बँक खात्यात तातडीने रक्कम जमा करण्यास भाग पाडले. भीतीपोटी ज्येष्ठ नागरिकाने आरोपींनी सांगितलेल्या खात्यात दहा कोटी ७४ हजार रुपये जमा केले. काही दिवसांनी फसवणूक झाल्याचे




लक्षात आल्यानंतर त्यांनी शिवाजीनगर येथील सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रार प्राप्त होताच सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. संबंधित बँक खात्याची छाननी करण्यात आली; तसेच आरोपींनी शहरातील काही एटीएममधून रक्कम काढल्याचे उघड झाले. एटीएममधील सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक केली. पोलिस उपायुक्त विवेक मासाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक स्वप्नाली शिंदे, निरीक्षक संगीता देवकाते, सहायक निरीक्षक अर्चना कटके, उपनिरीक्षक सुशील डमरे, अजित बढे, कृष्णकांत देसाई, रवींद्र साळवी, जान्हवी भडेकर, गंगाधर काळे, नवनाथ कोंडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## तरुणाला संपवलं, आरोपी मध्ये पोलिसाचा समावेश

**जळगाव :** जुन्या भांडणाच्या कारणावरून झालेल्या वादातून भयंकर घटना घडली आहे. एका अल्पवयीन तरुणासह सात जणांनी चौघांवर लाठ्या काठ्या व चाकूने हल्ला चढवला. यात एका १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून तिघे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घडली असून या प्रकरणी फैजपूर पोलीस ठाण्यात एका अल्पवयीन तरुणासह सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील संशयित आरोपींमध्ये मुंबई पोलीस दलात सेवेत असलेल्या एका पोलीस शिपायाचा देखील समावेश असल्याचे समजतेहिंगोणा ता. यावल या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र समोरील रहिवाशी दोन कुटुंबात शनिवारी सकाळी जुन्या वादावरून भांडण झाले. यात प्रथमेश महाले (वय १९), मोहित गजरे, रीना गजरे (वय १९) व निखिल गजरे (वय २६) या चौघांवर एक अल्पवयीन तसेच सुधीर तायडे, मनोज तायडे, सचिन तायडे, आरती सचिन तायडे, मंगला सर्व रा.हिंगोणा व निखिल तायडे रा. मारूळ ता. यावल यांनी एकत्र येऊन लाठ्या काठ्याने व चाकूने हल्ला चढवला.

## पोटातील गाठीऐवजी ३५ वर्षीय महिलेचं गर्भाशयच काढलं, चार डॉक्टरांवर गुन्हा

**पुणे :** गर्भाशयातील गाठ काढण्याच्या शस्त्रक्रियेसाठी खासगी रुग्णालयात दाखल झालेल्या ३५ वर्षाच्या महिलेचे गर्भाशयच काढून टाकल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी खासगी रुग्णालयातील चार डॉक्टरांविरोधात मांजरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.या प्रकरणी मुंढवा रस्त्यावरील साई केअर रुग्णालयातील डॉ. संदीप कराड, डॉ. मंदार साहुजी, डॉ. निहाल शेख, डॉ. शेहजाद शेख आणि सूरज कांबळे यांच्याविरोधात रुग्णाचे जीवित धोक्यात आणल्याप्रकरणी कलम १२५ (ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत, केशवनगर येथील ३५ वर्षीय महिलेने मांजरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना १५ सप्टेंबर २०२५ रोजी घडली. त्यानंतर तक्रारदारांना पुन्हा त्रास झाल्याने तपासणी केली असता, हा प्रकार उघड झाला.तक्रारदार महिला 'ब्यूटी पार्लर' चालवतात. त्यांनी २०२३ मध्ये सोनोग्राफी केली असता, गर्भाशयात छोटी गाठ असल्याचे दिसले. डॉक्टरांचा सल्ला घेऊन त्या उपचार घेत होत्या. मात्र,



त्रास वाढल्यानंतर त्यांना मागील वर्षी १३ सप्टेंबर रोजी मांजरी बुद्रुक येथील साई केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोनोग्राफीच्या अहवालाच्या आधारे डॉक्टरांनी लेझर शस्त्रक्रियेद्वारे गर्भाशयातील गाठ काढावी लागेल, असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार दुसऱ्याच दिवशी रुग्णालयात दाखल झाल्या. त्यानंतर १५ सप्टेंबरला त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. दोन दिवसांनंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.मात्र, अवघ्या दहा दिवसांतच त्यांना पुन्हा त्रास होऊ लागला. त्यामुळे त्या तपासणीसाठी रुग्णालयात गेल्या. त्या वेळी त्यांचे गर्भाशय काढून टाकण्यात आल्याचे उघडकीस आले. 'डिस्चार्ज समरी'त त्याचा उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांनी डॉक्टरांना विचारणा केली.

# मंगेश्री बाहेर येईल ना ? नागपुरात दारुगोळा निर्मिती कंपनीत एकाम ागून एक स्फोट, धुराच्या लोटांखाली एका आईची कासावीस प्रतीक्षा

**नागपूर :** रोजची तीच सकाळ, तेच काम ाचे तास आणि तोच उत्साह. कळमेश्वर तालुक्यातील राहुलगाव येथील 'एसबीएल एनर्जी लिमिटेड'मध्ये रविवारी सकाळची शिफ्ट नेहमीप्रमाणे सुरू झाली होती. पण सकाळी ७ ते ७.३० च्या सुमारास एकाएकी काळाकुट्ट धूर आकाशात झेपावला आणि पाठोपाठ सुरू झाला मृत्यूचा तांडव करणाऱ्या स्फोटांचा थरार...नागपूरच्या काटोल तालुक्यातील मौजा येनबिहीर येथे एस.बी.एल. एनर्जी लि. या दारुगोळा निर्मिती करणाऱ्या कंपनीत रविवार एक मार्च रोजी सकाळी सुमारे ७.४५ वाजता भीषण स्फोट झाला.



या दुर्घटनेत तब्बल १७ जणांचा मृत्यू झाला असून २४ जण गंभीर जखमी झाले आहेत.प्लांटमध्ये कार्यरत असलेल्या कांता चचाने यांच्यासाठी हा दिवस एखाद्या भयानक स्वप्नासारखा होता. त्या स्वतः तिथे काम करत होत्या. अचानक डेटोनेटर पॅकिंग युनिटमधून मोठ्या आकाराचा दगड आपटल्यासारखे प्रचंड आवाज येऊ लागले. पाहता पाहता आवाजाची तीव्रता इतकी वाढली की, संपूर्ण परिसर हादरला. 'जवळपास एक ते दीड तास एका मागोमाग एक स्फोट होत होते. आम्ही आजवर असा भीषण प्रकार कधीच पाहिला नव्हता,' असे शेजारच्या युनिटमध्ये कार्यरत कांता चचाने यांनी सांगितले. सुरक्षेच्या कारणास्तव सर्व काम गारांना तातडीने बाहेर काढण्यात आले. जीव वाचवण्यासाठी प्रत्येकजण गेटच्या दिशेने धावत होता, पण कांताबाईचे पाय मात्र तिथेच थबकले होते. ज्या 'डेटोनेटर पॅकिंग युनिट'मध्ये स्फोटांची मालिका सुरू होती, त्याच युनिटमध्ये त्यांची २६ वर्षांची मुलगी मंगेश्री रवींद्र येसकर काम करत होती. स्फोट थांबल्यानंतर जखमींना बाहेर काढण्याचे काम सुरू झाले. रुग्णवाहिकांचे सायरन आणि लोकांचा आरडाओरडा यात कांताबाईचे डोळे फक्त एकाच चेहऱ्याला शोधत होते. बाहेर येणाऱ्या प्रत्येक जखमीमध्ये त्या आपल्या लेकीला शोधत होत्या.

# करो या मरो युद्धात भारताचा धमाकेदार विजय, सेमीफाइनलमध्ये दणक्यात एन्ट्री

**मुंबई/वृत्तसंस्था :** सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने २०२६ च्या टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीचं तिकीट मिळवलं आहे. आता ५ मार्च रोजी दुसऱ्या उपांत्य फेरीत टीम इंडियाचा सामना इंग्लंडशी होईल. भारतीय संघाने दमदार फलंदाजी करत वेस्ट इंडिजचा पराभव केला. टीम इंडियाने हा सामना ५ विकेट्सने जिंकून सेमीफायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले. या वर्ल्डकपच्या चारही सेमीफायनलमधील संघांची नावे निश्चित झाली आहेत.



दरम्यान प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने ४ विकेट्स गमावून १९५ धावा केल्या होत्या. टीम इंडियाने १९६ धावांचे हे लक्ष्य शेवटच्या षटकात पूर्ण केले. यासह टीम इंडियाने इतिहास रचला आहे. वर्ल्ड कपमध्ये टीम इंडियाचा हा सर्वाधिक धावांचा पाठलाग आहे. या मैदानावर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यातही हा सर्वाधिक धावांचा पाठलाग आहे. भारतीय संघाने दमदार फलंदाजी करत वेस्ट इंडिजचा पराभव केला. १९६ धावांच्या प्रत्युत्तरात, संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांच्या जोडीने चांगली सुरुवात केली. पण अभिषेक शर्माने पुन्हा एकदा निराशा केली. तो ११ चेंडूत दोन चौकारांसह १० धावा काढून बाद झाला. इशान किशननेही ६ चेंडूत दोन चौकारांसह १० धावा केल्या. दोन विकेट पडल्यानंतर संजू सॅमसन आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी ३५ चेंडूत ५८ धावांची भागीदारी केली. १६ चेंडूत १८ धावांची संथ खेळी केल्यानंतर सूर्याही बाद झाला. त्यानंतर तिलक वर्मने १५ चेंडूत २७ धावांची जलद खेळी केली. हार्दिकने १४ चेंडूत १७ धावांचे योगदान दिले. टीम इंडियाकडून शिवम दुबे आणि संजू सॅमसन नाबाद राहिले. सॅमसनने ५० चेंडूत १२ चौकार आणि ४ षटकारांसह ९७ धावा काढल्या. दुबे ४ चेंडूत ८ धावांवर नाबाद राहिला. संजू सॅमसनने वेस्ट इंडिजविरुद्ध ५० चेंडूत नाबाद ९७ धावा केल्या. १०४ च्या स्ट्राईक रेटने खेळलेल्या या खेळीत १२ चौकार आणि चार षटकारांचा समावेश होता. टी२० विश्वचषक धावांचा पाठलाग करताना भारतीय फलंदाजाने केलेली ही सर्वोच्च खेळी होती. यापूर्वी ८२ धावांचा हा विक्रम विराट कोहलीच्या नावावर होता. मी अनेक वर्षांपासून हा फॉरमॅट खेळतोय. मी कोहली, रोहित शर्मा आणि एम.एस. धोनी सारख्या महान खेळाडूंकडून खूप काही शिकलो आहे. त्यांच्या अनुभवाचा मला फायदा झाला. हे दिग्गज खेळाडू परिस्थितीनुसार आपला खेळ कसा बदलतात, हे मी जवळून पाहिले आहे. मागच्या सामन्यात आम्ही प्रथम फलंदाजी करत होतो, त्यामुळे मी पहिल्या चेंडूपासून आक्रमक खेळत होतो. पण या सामन्यात परिस्थिती वेगळी होती. जेव्हा जेव्हा मी जास्त जोखीम घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आम्ही विकेट्स गमावल्या. मला वाटलं नव्हतं की मी अशी विशेष खेळी खेळेन, पण हो, हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आणि आनंदाचा दिवस आहे.

## भारतीय महिला संघाचा दारुण पराभव

**होबार्ट/अहमदाबाद :** कर्णधार ॲलिसी हिली आणि बेथ मुनी यांच्या दमदार शतकांच्या जोरावर रविवारी येथे खेळिवण्यात आलेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या वनडे सामन्यात यजमान ऑस्ट्रेलिया महिला संघाने भारताचा १८५ धावांनी दणदणीत पराभव केला. या मालिकेत ऑस्ट्रेलियाने तीनही सामने जिंकून भारताचे आव्हान एकतर्फी संपुष्टात आणले.

हरमनप्रित कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला क्रिकेट संघ सध्या ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात भारतीय महिला संघाने ३ सामन्यांची टी-२० मालिका २-१ अशा फरकाने जिंकली होती. पण त्यानंतर ३ सामन्यांच्या वनडे मालिकेत भारताला एकतर्फी पराभव स्वीकारावा लागला. आता या दौऱ्यात उभय संघात एकमेव कसोटी सामना खेळिवला जाणार आहे.

या शेवटच्या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला प्रथम फलंदाजी दिली. ऑस्ट्रेलियाने ५० षटकात ७ बाद ४०९ धावा झोडपल्या. त्यानंतर भारताचा डाव ४५.१ षटकात २२४ धावांत आटोपला.

ऑस्ट्रेलियाच्या डावात कर्णधार ॲलिसा हिलीने ९८ चेंडूत २ षटकार आणि २७ चौकारांसह १५८ धावा फटकावल्या. बेथ मुनीने ८४ चेंडूत १ षटकार आणि १० चौकारांसह नाबाद १०६ धावा जमविल्या. लिचफील्डने १ षटकारासह १४ धावा तर जॉर्जिया व्हॉलने ५२ चेंडूत १ षटकार आणि ७ चौकारांसह ६२ धावा केल्या. सदरलँडने ३ चौकारांसह २३ धावा तर निकोला कॅरेने १५ चेंडूत १ षटकार आणि ४ चौकारांसह नाबाद ३४ धावा जमविल्या. व्हॉल आणि हिली यांनी दुसऱ्या गड्यासाठी १०४ धावांची भागिदारी केली. तर हिली आणि बेथ मुनी यांनी तिसऱ्या गड्यासाठी १४५ धावांची भर घातली. हिलीने ७९ चेंडूत १८ चौकारांसह तर मुनीने ८२ चेंडूत १ षटकार आणि ९ चौकारांसह शतके पूर्ण केली.

## नवाराने बरोबरीत रोखल्याने गुकेशचा विजयाचा शोध चालूच

**प्राग/वृत्तसंस्था :** प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवाच्या चौथ्या फेरीत झेक प्रजासत्ताकच्या डेव्हिड नवाराने बरोबरीत रोखल्याने जागतिक विजेता डी. गुकेशचा पहिला विजय मिळविण्याचा प्रयत्न सुरूच राहिला. या दिवशी हॉलंडच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टने चार सामन्यांमध्ये तिसरा विजय मिळवून इतरांवर आघाडी घेतली, तर गतविजेता अरविंद चिदंबरम जर्मनीच्या विन्सेंट कीमरविरुद्ध पराभूत झाला.



व्हॅन फॉरेस्टने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक याकुबबोएव्हचा पराभव केला. तर १० खेळाडूंच्या राउंड-रॉबिन स्पर्धेतील इतर दोन सामने बरोबरीत संपले. अमेरिकन हान्स मोके निमनने इराणच्या परहम मगसुदलूशी बरोबरी साधली आणि डेव्हिड आंतोन गुइजारोने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक याकुबबोएव्हविरुद्ध तसाच निकाल मिळवला. पाच फेऱ्या अजून बाकी असताना आणि अर्धा टप्पा ओलांडण्याची वेळ आली असताना व्हॅन फॉरेस्ट तीन गुणांसह आघाडीवर असून त्यानंतर अब्दुसत्तोरोव्ह आणि नवारा आहेत, जे याकुबबोएव्ह, कीमर आणि गुइजारो यांच्यापेक्षा अर्ध्या गुणाने पुढे आहेत.

उर्वरित चार सहभागी चिदंबरम, गुकेश, निमन आणि मगसुदलू हे सर्व जण प्रत्येकी १.५ गुणांसह सातव्या स्थानावर आहेत. झेक प्रजासत्ताकच्या या अव्वल खेळाडूला गुकेशविरुद्ध कठीण परिस्थितीत स्वतःचे रक्षण करावे लागले, परंतु त्याने विश्वविजेत्याला कोणताही निर्णायक फायदा मिळवून दिला नाही. ७२ चालींनंतर गुकेशला गुण विभागून घ्यावे लागले. दुसरीकडे, चिदंबरमने फिलिडोर डिफेन्सला चिकटून राहण्याचा निर्णय घेतल्याने कीमरला आश्चर्य वाटले. या जवळजवळ एकतर्फी सामन्यात भारतीय खेळाडूने आधी एक मोहरा गमावला आणि नंतर एका उंटाला गमवले. दरम्यान, चॅलेंजर्स विभागात जागतिक महिला विश्वचषक विजेत्या दिव्या देशमुखने एकट्याने आघाडीवर असलेल्या झेक प्रजासत्ताकच्या व्हॅक्लाव फिनेकशी बरोबरी साधली, तर दुसरा भारतीय खेळाडू सूर्यशेखर गांगुलीने यजमान देशाच्या स्टेपन हर्बेकविरुद्धचा सामना बरोबरीत सोडविला. दिव्याचे स्पर्धेत १.५ गुण झाले आहेत आणि गांगुलीचा एक गुण झालेला आहे. ३ गुणांनिशी फिनेच आघाडीवर आहे.

## आफ्रिकेकडून झिंबाब्वेचा पाच गड्यांनी पराभव ; सिकंदर रझा सामनावीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बलाढ्या दक्षिण आफ्रिकेने टी-२० विश्वचषक पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत आपली विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत प्रवेश मिळिवला. या स्पर्धेतील सुपर ८ फेरीतील येथे रविवारी झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने झिंबाब्वेचा १३ चेंडू बाकी ठेवून ५ गड्यांनी पराभव केला. झिंबाब्वेचा अष्टपैलू सिकंदर रझाने दर्जेदार कामगिरी केली पण आपल्या संघाला पराभवापासून तो वाचवू शकला नाही. रझाने या सामन्यात ४३ चेंडूत ७३ तसेच गोलंदाजीत २९ धावांत ३ गडी बाद केल्याने त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.




या स्पर्धेतील रविवारचा हा ५१ वा सामना होता. दक्षिण आफ्रिकेने या स्पर्धेत प्राथमिक फेरीतील तसेच त्यानंतर सुपर ८ फेरीतील आपले तिन्ही सामने जिंकून गट १ मधून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

रविवारच्या सामन्यात झिंबाब्वेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिंबाब्वेने २० षटकात ७ बाद १५३ धावा जमविल्या. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेने १७.५ षटकात ५ बाद १५४ धावा जमवित विजय नोंदविला. झिंबाब्वेच्या डावामध्ये कर्णधार सिकंदर रझाने ४३ चेंडूत ४ षटकार आणि ८ चौकारांसह ७३ धावा झळकाविल्या. क्लाईव्ह मदांडेने २० चेंडूत ३ चौकारांसह नाबाद २६ धावा केल्या. बेनेटने १ षटकार आणि १ चौकारासह १५, मेयर्सने १ चौकारासह ११ धावा जमविल्या. इव्हान्सने १ षटकारासह ८ धावा केल्या. झिंबाब्वेच्या डावात ६ षटकार आणि १४ चौकार नोंदविले गेले. झिंबाब्वेने पॉवरप्ले दरम्यानच्या ६ षटकात ४५ धावा जमविताना २ गडी गमाविले. झिंबाब्वेचे अर्धशतक ४० चेंडूत, शतक ८२ चेंडूत तर दीडशतक १२० चेंडूत नोंदविले गेले. सिकंदर रझाने २९ चेंडूत ३ षटकार आणि ५ चौकारांसह अर्धशतक झळकाविले. मारूमनी आणि बेनेट यांनी ८ चेंडूत सलामीच्या गड्यासाठी १४ धावा जमविल्या. मफाकाच्या यॉर्करवर मारूमनीचा त्रिफळा उडविला. त्याने ७ धावा केल्या. त्यानंतर नॉर्त्जेने बेनेटला मार्करमकरवी झेलबाद केले. त्याने १५ धावा जमविल्या. लिन्डेने मायर्सला ब्रेव्हिसकरवी झेलबाद केले. बर्ल ५ धावावर तर मूनयोंगा २ धावावर बाद झाले. झिंबाब्वेचा निम्मा संघ ११.४ षटकात ८७ धावांत बाद झाला. त्यानंतर कर्णधार सिकंदर रझा आणि मदांडे यांनी सहाव्या गड्यासाठी ३९ धावांची भर घातली. दक्षिण आफ्रिकेतर्फे मापेकाने २१ धावांत २ बॉशने ४० धावांत २ बळी मिळिवले. तर लिन्डे, एन्गिडी, नॉर्त्जे यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना सिकंदर रझाच्या भेदक गोलंदाजीसमोर दक्षिण आफ्रिकेचे सलामीचे फलंदाज कर्णधार मार्करम आणि डी कॉक हे लवकर बाद झाले. डावातील पहिल्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर सिकंदर रझाने डी कॉकला खाते उघडण्यापूर्वी झेलबाद केले. तर डावातील तिसऱ्या षटकात सिकंदर रझाने मार्करमचा ४ धावांवर त्रिफळा उडविला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'माझे अकाउंट्स अजूनही बाबाच बघतात, नवऱ्यापेक्षा जास्त कमावते' सोनालीचं विधान चर्चेत

**मुंबई :** मराठमोळी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी नेहमी चर्चा असते. तिचे प्रत्येक सिनेमे नेहमी हीट होतात. सोनाली तिच्या व्यवसायिक आयुष्य प्रमाणेच वैवाहिक आयुष्यासाठी ही चर्चेत असते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने एक असे काही विधान केले आहे ज्यामुळे ती आता सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. या मुलाखतीमध्ये तिने तिच्या संसाराबद्दल सांगितले.ती म्हणाली की जेव्हा मी लग्न करण्याचा गांभीर्याने विचार केला तेव्हा मुलगा कसा पाहिजे याबद्दल आधी ठरवलेलं. मला असं वाटलं की घरी आल्यानंतर आम्ही त्याच त्याच गप्पा मारणार नाही. जो मला जगण्याची दुसरी बाजूही दाखवेल. आयुष्य छोटं नाही त्याला बऱ्याच बाजू आहेत. म्हणून मी इंडस्ट्री बाहेरचा मुलगा बघत होते. त्यानंतर मी कुणाला भेटले आणि त्यांनी मला गोष्टींकडे वेगळ्या दृष्टीने बघण्याचा दृष्टिकोन दिला. आम्ही दोघेही खूप प्रवास करतो. आम्हाला जगातल्या विविध ठिकाणी फिरायला आवडतं. आम्ही ठरवलं आहे की प्रत्येक



वाढदिवसाला एक नवीन देश बघायचा. मी गृहिणी म्हणून संसार आणि घराकडे बघते. आम्ही एकत्र आहोत परंतु आमच्या आर्थिक गोष्टी वेगवेगळ्या आणि स्वतंत्र आहे.पैसे कमावण्याबद्दल सोनाली कुलकर्णी म्हणाले की, बरेचदा लोकांच्या कमेंट्स येतात किंवा सुरुवातीला यायच्या- नवरा बाहेरच्या देशातला आहे तर खूप कमावणारा असेल वगैरे वगैरे... शेवटी मुली हेच करतात तर मला अभिमानाने सांगायला आवडेल की मी माझ्या नवऱ्या पेक्षा जास्त कमावते. त्यामुळे मी त्याचे पैसे बघितलेले नाहीत. मला माहित नाही की तो किती कमवतो. मला नेमके पैसे माहित नाहीत पण आमच्यात ही चर्चा झाली आहे की मी त्याच्यापेक्षा जास्त कमावते. आणि याचं त्यालाही काहीच वावगं वाटत नाही किंवा असुरक्षित वाटत नाही.मलाही यामध्ये काही वेगळं वाटत नाही कारण एक वेळ अशी येईल जेव्हा मी ठरवेल की आता मला काम करायचं नाही तेव्हा तोच कमावणार आहे. आम्ही आमचे आर्थिक व्यवहार वेगळे करतो. माझे आणि त्याचे अकाउंट्स वेगळे आहेत. त्याने मला आजवर कधीच विचारलं नाही की तू इतके पैसे कमावतेस मग ते गेले कुठे? माझे अकाउंट माझे बाबा सांभाळतात, माझे इतर आर्थिक व्यवहारही माझे बाबा बघतात. त्यामध्ये माझ्या नवऱ्याचा किंवा सासरकडच्यांचा हस्तक्षेप नसतो.

## चावरा होता टायगर श्रॉफ, 'मुलींच्या चेहऱ्याचा मुलगा' म्हणत चिडवायचे लोक

**मुंबई :** बॉलीवूड अभिनेता टायगर श्रॉफचा २ मार्च २०२६ रोजी वाढदिवस असतो. बॉलिवूड फिल्मइंडस्ट्रीत टायगरला ॲक्शन हिरो म्हणून ओळखले जाते. पण त्याच्या सुरुवातीच्या काळात, तो त्याच्या मुलींसारख्या चेहऱ्यामुळे वारंवार ट्रोल होत असे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, एका दिग्दर्शकाने एकदा त्याची खिल्ली उडवली होती, त्याला ट्रान्सजेंडर म्हटले होते आणि तसच मोस्ट ब्युटीफुल वुमन म्हणून त्याला टोमणाही मारला होता.टायगरने २०१४ मध्ये सब्बीर खानच्या 'हिरोपंती' या चित्रपटातून कृती सॅननसोबत बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. पहिल्या चित्रपटाच्या यशानंतर, टायगरने 'बागी' आणि 'वॉर' सारखे हिट चित्रपट दिले आणि स्वतःची एक ॲक्शन हिरो म्हणून ओळख निर्माण केली.२०१७ मध्ये, बॉलिवूड अभिनेता विद्युत जामवालने सोशल मीडियावर एक ऑडिओ क्लिप शेअर केली होती. अभिनेत्याने दावा केला होता की ती दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांची आहे. ते दारूच्या नशेत होते आणि ऑडिओ क्लिपमध्ये त्यांनी टायगर श्रॉफचा उल्लेख ट्रान्सजेंडर म्हणून केला आणि त्याला सर्वात सुंदर महिला देखील म्हटले.टायगर श्रॉफचे खरे नाव जय हेमंत आहे.

## मी देवाकडे मृत्यूसाठी प्रार्थना करायचे' लोकप्रिय अभिनेत्रीनं सांगितला तिहार जेलमधील अनुभव

**मुंबई :** दाक्षिणात्य अभिनेत्री संदीपा विर्कने ६ कोटींच्या फसवणुकीच्या प्रकरणात तिहार तुरुंगात जवळजवळ चार म हिने घालवले. तिला नुकताच जामीन मंजूर झाला. अभिनेत्रीनं अलीकडेच तुरुंगातील तिचा अनुभव शेअर केला.सिमरन जोत मक्करसोबतच्या संभाषणात संदीपा म्हणाली, 'तिहार हे असं ठिकाण आहे जिथे मी माझ्या सर्वात वाईट शत्रूलाही पाठवू इच्छित नाही. जेव्हा मी पहिल्यांदा तिथे गेले तेव्हा मी देवाला सांगितलं की, मी यासाठी लायक नाही. पहिल्या दिवशी, जेव्हा मी वॉशरूममध्ये गेले तेव्हा मला वाटलं, लोक म्हणतात की सर्वकाही कर्माचे परिणाम आहेत, कदाचित मी माझ्या मागील जन्मात काही चुका केल्या असतील, जाणूनबुजून किंवा अनावधानानं. मी देवाकडे मृत्यूसाठी प्रार्थना केली. जेव्हा तुम्ही तुरुंगात असता आणि तुमचे पालक तुम्हाला भेटायला येतात, तेव्हा खूप वाईट वाटतं.माझी तब्येत खूप बिघडलेली. ताणतणावामुळे मी आधाराशिवाय उभीही राहू शकत नव्हते. आजही जेव्हा मी त्याबद्दल विचार करते तेव्हा मला रडायला येतं - माझ्यासोबत असं का घडलं? शौचालयं घाणेरडी होती. जमिनीवर झोपावं लागायचं. बॅरेक सकाळी ६ वाजता उघडत, दुपारी १२ वाजता बंद होत, दुपारी ३ वाजता पुन्हा उघडत आणि संध्याकाळी ६ वाजता पुन्हा बंद होत. जेवण



भयानक होतं - तीच डाळ, तीच भाजी, चार चपात्या आणि भात दररोज. मला काहीही खाण्याची इच्छा नव्हती.' असं अभिनेत्रीनं पुढे सांगितलं.तुरुंगात मिळणाऱ्या वागणुकीबद्दल बोलताना संदीपा म्हणाली, 'काही महिला पोलिस अधिकारी चांगल्या असतात, तर काही कैद्यांवर त्यांचा राग काढतात. जेव्हा माझ्याबद्दल बातम्या पसरल्या तेव्हा लोक म्हणाले, 'ती फसवणूक करणारी आहे.' मला वाटलं, 'खूनाच्या आरोपींना नॉर्मल वागणूक दिली जात आहे आणि मी न केलेल्या गोष्टीसाठी मला फसवणूक म्हटलं जातंय.'



## मी, माझा नवरा आणि मूल, इतकं छोटं आयुष्य जगू शकत नाही.. लग्नाबद्दल स्पष्टच बोलली प्राजक्ता

**मुंबई :** मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी प्रोफेशनल आयुष्यासोबतच वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असते. प्राजक्ता माळीचा मोठा चाहतावर्ग आहे. त्यामुळे अभिनेत्री लग्न कधी करणार? असा प्रश्न कायम चाहत्यांना असतो. एका मुलाखतीदरम्यान प्राजक्ता माळीला लग्नाबद्दल विचारण्यात आलेलं. त्यावर प्राजक्ता माळीनं सांगितलेलं की, कुटुंब ही तिची प्रायोरिटी असणार नाहीये. करिअर हे अभिनेत्रीला महत्वाचं असणार असून ते स्वीकारणारा जर एखादा मुलगा अभिनेत्रीच्या आयुष्यात आला तर ती लग्न करेल, असं प्राजक्ता म्हणालेली.राजश्री मराठीला दिलेल्या मुलाखतीमध्ये प्राजक्ता माळी म्हणाली की, 'माझ्या वाचनात तीन गोष्टी आल्या आहेत. मी इंडस्ट्रीमध्ये अचानक आले, मी ठरवलं नव्हतं. 'फुलवंती' सिनेमाची निर्मिती करायची, हे मी ठरवलेलं. त्यामुळे या दोन गोष्टी आहेत. तिसरी गोष्ट म्हणजे, आपल्याला एखादी गोष्ट करायला दुसरं भाग पाडतं. त्यामुळे पहिल्या दोनमध्ये तर माझं लग्न होणार नाहीये. नॅच्युरली तर ते होणार नाहीये, कारण युनिव्हर्सला माहितीये मी सिंगल राहावं. मी पण लग्नाच्या झोनमध्ये नाहीये. माझ्या आईला माझ्या लग्नाबद्दल वाटतं. इंडस्ट्रीमध्ये अवघड आहे, असं मला वाटतं.'प्राजक्ता पुढे म्हणाली की, 'मला अजून एक वाटतं ते म्हणजे, आपल्याला सगळ्याच गोष्टी नाही मिळत. तुम्हाला पैसा, प्रसिद्धी मिळाली ना! मग आता प्रेम नाही मिळणार. सगळं देव कसं देईल. तो त्याग आहे एक प्रकारचा आणि ते मी स्वीकारलंय. लग्न झालं किंवा नाही झालं, मला एक माहितीये की, माझं कौटुंबिक आयुष्य माझी प्रायोरिटी नसणार आहे. माझी सोशल लाईफ, माझं करिअर खूप महत्वाचं आहे.''मी, माझा नवरा, माझा मुलगा इतकं छोटं आयुष्य मी जगू शकत नाही. एक मूल का? जर मी १०० मुलांचा सांभाळ करू शकते. १०० मुलांना दत्तक घेऊन त्यांचा सांभाळ करू शकते. जर मी संपूर्ण शहराला इन्फ्लुएन्स करू शकते, तर मी एका कुटुंबाला का इन्फ्लुएन्स करू? जर त्यातल्या त्यात कोणी असला हे सम जून घेणारा तर चालेल. आता हा निर्णय देवाकडे. मी त्यासाठी प्रयत्न करत नाहीये, आई करतेय.' असं प्राजक्ता पुढे म्हणाली.

***

# डाक अदालत सोमवार रोजी ९ मार्चला होणार

जनसंचलन/बुलढाणा

पोस्ट विभागाच्या तक्रारी सोडविण्यासाठी बुलडाणा डाकघर विभागातर्फे सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डाक अदालत आयोजित करण्यात आले आहे. पोस्टाच्या कार्याविषयी किंवा कामकाजाबद्दल सहा आठवड्यात तक्रारींचे निवारण झालेले नसल्यास अशा तक्रारींची दखल डाक अदालतीमध्ये घेतल्या जाणार आहे.

देशातील पोस्टाची सेवा ही सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा एक अभिन्न भाग आहे. देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये पोस्टाच्या सेवेने वेगळ्या प्रकारचे स्थान निर्माण केले आहे. पोस्ट खाते हे लोकांना चांगल्या प्रकारची सेवा देण्याचा व ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान करण्याचा प्रयत्न करते. ही सेवा देताना संभाषण, पत्रव्यवहार किंवा सेवेमध्यील काही त्रुटीमुळे पोस्टाच्या सेवेबद्दल तक्रारी होतात. तक्रारींचा योग्य प्रकारे न्याय निवडा करण्यासाठी पोस्ट खात्यातर्फे डाक अदालती घेण्यात येते. विशेषत: टपाल, स्पीड पोस्ट, डाक वस्तू पार्सल, बचत बँक आणि मनीऑर्डरबाबत तक्रारी विचारात घेतल्या जातील. तक्रारींचा उल्लेख सर्व तपशीलासह केलेला असावा. तक्रारीत तारीख आणि ज्या अधिकाऱ्यास मुळ तक्रार पाठविली त्याचे नाव आणि हुद्दा आदी संबधित माहिती डाक सेवेबाबत तक्रार डाकघर अधिक्षक गणेश आंभोरे, बुलडाणा विभाग, यांचे नावे दोन प्रतीत शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ पर्यंत पोहचेल, अशा रीतीने पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग खरेदी-विक्री संमेलन ७ मार्चला

जनसंचलन/बुलढाणा

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना () अंतर्गत जिल्ह्यातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी तसेच स्थानिक उत्पादनांना चालना देण्यासाठी जिल्हा प्रशासन व कृषी विभाग, बुलढाणा यांच्या वतीने शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता जिजामाता प्रेक्षागृह येथे विशेष जिल्हास्तरीय खरेदी-विक्री संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनाचा मुख्य उद्देश उत्पादक आणि खरेदीदार यांच्यात थेट संपर्क प्रस्थापित करणे हा आहे. जिल्ह्यातील वैयक्तिक लाभार्थी, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या () तसेच सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योजक या संमेलनात सहभागी होणार आहेत. संमेलनात मसाले, धान्य प्रक्रिया उत्पादने, फळ-भाजीपाला प्रक्रिया पदार्थ, लोणची, पापड, चटण्या आणि बेकरी उत्पादनांचे स्टॉल्स उभारले जाणार असून स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री केली जाणार आहे. कार्यक्रमादरम्यान तज्ज्ञांकडून ब्रँडिंग व आकर्षक पॅकेजिंग तंत्र, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण () नोंदणी प्रक्रिया, बँक कर्ज सुविधा व शासन अनुदान, तसेच खरेदीदार-उत्पादक यांच्यातील व्यावसायिक करार याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. स्थानिक उत्पादनांना व्यापक व जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हे संमेलन महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त इच्छुक उद्योजक, विक्रेते व नागरिकांनी निर्धारित वेळी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासन व कृषी विभाग, बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बुलढाण्यात विमेन्स फेस्ट २०२६ चे दिमाखदार आयोजन..!

जनसंचलन/बुलढाणा



अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलन, बुलढाणा यांच्या वतीने आयोजित विमेन्स फेस्ट २०२६ ला आजपासून मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. बुलढाणा शहरातील महिलांच्या कलागुणांना आणि उद्योजकतेला वाव देण्यासाठी, तसेच शहरवासीयांना खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यासाठी विमेन्स फेस्ट २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील रेणुका मंगल कार्यालय, मेन रोड येथे हे भव्य प्रदर्शन आणि सेल आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आज, मा. सौ. कोमलताई सुकेशजी झंवर (अध्यक्षा, बुलढाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटी) यांच्या शुभहस्ते झाले आहे तसेच याप्रसंगी सौ. स्वातीताई कन्हेर, डॉ. सुनीताजी बोथरा, सौ. अनुजाताई सावळे , सौ. अंजलीताई परांजपे, डॉ. वैशालीजी पडघान, सौ. दीपाजी अग्रवाल आणि डॉ. गायत्री साबळे यांची गरिमामयी उपस्थिती होती . दोन दिवस चालणाऱ्या या फेस्टमध्ये (२८ फेब्रुवारी आणि १ मार्च): विविध वस्तूंचे आकर्षक स्टॉल्स आणि प्रदर्शनी लावण्यात आलेली आहे. चटकदार आणि स्वादिष्ट व्यंजनांची रेलचेल सुद्धा याठिकाणी करण्यात आलेली आहे. अखिल भारतीय मारवाडी महिला संमेलनाच्या अध्यक्षा सौ. सपना अग्रवाल आणि सचिव सौ. वर्षा जैन यांनी सर्व नागरिकांना, विशेषतः महिलांना या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.या वेळी सपना अग्रवाल,वर्षा जैन,कल्पना मूंधडा, अस्मिता अग्रवाल,ममता झवर,राधिका अग्रवाल,मोना शर्मा,प्रणिता लाहोटी, शीतल मावतवाल, श्रेया डालमिया, श्रृति अग्रवाल आदी महिला मोठ्या संख्याने उपस्थितीत होत्या.

# ८ मार्च रोजी विधी सेवा महाशिबिर; जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी घेतला तयारीचा आढावा

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने चिखली तालुक्यातील अमडापूर येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. मौजे अमडापूर देवी संस्थाच्या परिसरात ८ मार्च रोजी सकाळी १० वा. पासून सुरू होणाऱ्या या शिबिराच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव नितीन पाटील यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या शिबिराच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना एकाच छताखाली सर्व शासकीय योजनांचा लाभ आणि कायदेशीर मार्गदर्शन मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सर्व विभागांच्या प्रमुखांना सेवा शिबिरांच्या अनुषंगाने विशेष सूचना दिल्या. शिबिराच्या ठिकाणी ५० स्टॉल्स लावण्यात येणार असून नगरपालिका, आरोग्य, कृषी, जिल्हा कौशल्य विकास, जिल्हा रेशीम उद्योग, जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सहकार, महसूल, समाज कल्याण, एकात्मिक बाल विकास आणि कामगार कल्याण अशा विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती, संजय गांधी निराधार योजना, घरकुल योजना, श्रावणबाळ योजना, आयुष्मान भारत कार्ड, जातीचे व उत्पन्नाचे दाखले, आयुष्यमान कार्ड आणि नवीन रेशन कार्ड यांसारख्या सेवा प्रत्यक्ष जागेवरच उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांना लाभार्थ्यांची यादी आगाऊ तयार ठेवण्याचे आणि त्यांना शिबिराची माहिती देण्याचे निर्देश दिले आहेत.

केवळ शासकीय योजनाच नव्हे, तर कायदेशीर साक्षरतेवरही या शिबिरात भर दिला जाणार आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे वकील आणि तज्ज्ञ यादिवशी नागरिकांना मोफत कायदेशीर सल्ला देणार असून, प्रलंबित खटल्यांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या शिबिरामध्ये महिला, शेतकरी व गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ दिल्या जाणार आहे. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी केले.

# मलकापूर तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

माहे जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ दरम्यान मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापन होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ग्रामविकास विभाग यांच्या आदेश दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ अन्वये प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार मलकापूर तालुक्यातील ३३ ग्रामपंचायतींचा या कार्यक्रमात समावेश करण्यात आला आहे. समाविष्ट ग्रामपंचायती याप्रमाणे : दसरखेड, नरवेल, विवरा, भानगुरा, तिघ्रा, म्हैसवाडी, वाघोळा, दुधलगाव खुर्द, चिखली, निबारी, घिर्णी, वाघुड, माकनेर, वडोदा, धरणगाव, भालेगाव, कुंड खुर्द, कुंड बु., तालसवाडा, तांदलवाडी, हिंगणाकाझी, शिराढोण, भाडगणी, पिंपळखुटा बु., दाताळा, वरखेड, लासुरा, खामखेड, जांभुळधाबा, वडजी, दुधलगाव बु., लोणवडी व हरणखेड.

प्रारूप प्रभाग रचना तयार करणे: तहसिलदार यांनी गुगल अर्थ नकाशांवर सुपर इम्पोज करून गावनिहाय नकाशे अंतिम करणे, तलाठी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्थळ पाहणीनंतर प्रभाग पाडणे व सीमा निश्चित २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून तपासणी ५ मार्च, उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर ११ मार्च, जिल्हाधिकाऱ्यांची तपासणी व राज्य निवडणूक आयोगाकडे सादरीकरण १७ मार्च करण्यात येईल. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्याकडून २३ मार्चपर्यंत आवश्यक दुरुस्तीसह मान्यता दिली जाईल. दुरुस्त्या अंतर्भूत करून समितीकडून ३० मार्च २०२६ रोजी प्रारूप प्रभाग रचना मंजूर केली जाईल. हरकती व सूचना मागविणे : प्रारूप प्रभाग रचनेला नमुना ङ्कबफ मध्ये व्यापक प्रसिद्धी देऊन ७ एप्रिल २०२६ पर्यंत हरकती व सूचना मागविण्यात येतील. हरकती सादर करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल २०२६ आहे. प्राप्त हरकती १६ एप्रिलपर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर करून २१ एप्रिल रोजी सुनावणी घेण्यात येईल. त्यानंतर २३ एप्रिलपर्यंत अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेलोडी रोडवर कुंटणखान्यावर पोलिसांचा हातोडा! देहविक्री अड्डा उद्ध्वस्त

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव तालुक्यातील शेलोडी रोड परिसरात सुरु असलेल्या अवैध देहविक्री व्यवसायावर अखेर पोलिसांनी कडक हात टाकत मोठी कारवाई केली आहे. अनेक दिवसांपासून संशयाच्या भोवऱ्यात असलेल्या एका घरावर रात्री उशिरा टाकलेल्या धाडीत हा कुंटणखाना उद्ध्वस्त करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे. ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या या अवैध धंद्याची माहिती मिळताच पोलिस अधिकारी आदित्यकुमार सिंग यांच्या पथकाने सापळा रचत थेट छापा टाकला. या कारवाईत तीन महिला, चार पुरुष आणि एक महिला एजंट यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर पिटा कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शेलोडी रोड परिसरातील नागरिकांना या ठिकाणी सुरू असलेल्या संशयास्पद हालचालींचा त्रास सहन करावा लागत होता. रात्री अपरात्री होणारी ये-जा, अनोळखी व्यक्तींची वर्दळ आणि वाढती अस्वस्थता यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप उसळला होता. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला होता. अखेर वरिष्ठांच्या आदेशानंतर पोलिसांनी धडक कारवाई करत हा अवैध अड्डा उध्वस्त केला. या धंद्यामुळे परिसरातील शांतता आणि सामाजिक वातावरण बिघडत असल्याची भावना



नागरिकांनी व्यक्त केली होती. पोलिसांच्या या कारवाईमुळे स्थानिकांना दिलासा मिळाला असून अशा अनैतिक कृत्यांविरुद्ध कठोर भूमिका घेण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्याचे काम सुरू असून अशा अवैध व्यवसायांवर पोलिसांचा करडी नजर राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. खामगाव तालुक्यातील अशा प्रकारांना आळा बसवण्यासाठी प्रशासनाने सातत्याने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

# बॅटरी नाही, वीज नाही तरीही सुपर गणकयंत्र!
## कदमापूरच्या गुरुजींची भन्नाट आयडिया



**जनसंचलन/ खामगाव**

तालुक्यातील कदमापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक राजेश कोगदे यांनी शिक्षण क्षेत्रात अक्षरशः क्रांती घडवून आणली आहे. ङ्खमाझ्या वर्गात गणितात ढ विद्यार्थीच नाहीफ्र असा ठाम दावा करत त्यांनी एक भन्नाट आव्हान दिले आहे.गणितात कमजोर विद्यार्थी दाखवा आणि थेट १००० रुपये मिळवा! गणिताची भीती घालवण्यासाठी कोगदे गुरुजींनी कोणत्याही महागड्या तंत्रज्ञानाचा आधार न घेता फक्त प्लास्टिक पाईपपासून एक अनोखे गणकयंत्र तयार केले आहे. विशेष म्हणजे हे गणकयंत्र चालवण्यासाठी ना बॅटरी लागते ना वीज! पूर्णपणे शून्य खर्चात तयार झालेले हे साधन विद्यार्थ्यांसाठी ङ्खखेळता खेळता गणित शिकवणारे शिक्षकफ्रठरत आहे. या गणकयंत्राच्या मदतीने विद्यार्थी बेरीज, वजाबाकी आणि गुणाकार सहजपणे पडताळू शकतात. उत्तर चुकले तर हे साधन लगेच विद्यार्थ्यांना त्यांच्या चुका दाखवते. परिणामी गणिताची भीती दूर होऊन विद्यार्थ्यांमध्ये विषयाविषयी आत्मविश्वास आणि आवड निर्माण होत आहे. कोगदे गुरुजींच्या वर्गात तब्बल ३८ विद्यार्थी असून सर्व विद्यार्थी गणितात प्रगत असल्याचा त्यांचा ठाम दावा आहे. ङ्खएकही विद्यार्थी मागे राहणार नाहीफ्र या निर्धारातूनच हे अभिनव प्रयोग साकारले असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषद प्रशासनाकडून मिळणारे प्रोत्साहन आणि शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक वातावरण यामुळेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी असे प्रयोग शक्य होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# जळगाव जामोद तहसील कार्यालयात खदखद!




**जनसंचलन/ जळगाव जामोद**

येथे महसुली कामकाजावरून वातावरण तापले असून तहसीलदार पवन पाटील यांच्या कार्यपद्धतीवर वकील संघाने थेट आक्षेप घेतल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. वकील संघाने उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या निवेदनात तहसीलदारांवर गंभीर आरोप करत सुनावणी प्रक्रियेत पक्षकारांना पुरेसा वेळ न दिला जात असल्याचा ठपका ठेवला आहे. वकील संघाच्या म्हणण्यानुसार, एका दिवसात तब्बल ४० ते ५० महसुली प्रकरणे सुनावणीस ठेवली जातात. त्यामुळे न्याय मिळण्याऐवजी घाईघाईत निर्णय दिले जात असल्याची भावना निर्माण होत आहे. याशिवाय, काही वकिलांना सुनावणीदरम्यान अपमानास्पद वागणूक मिळाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे कायदेशीर प्रक्रियेचा सन्मान धोक्यात येत असल्याचे वकिलांचे म्हणणे आहे. दरम्यान, तहसीलदार पवन पाटील यांनी हे सर्व आरोप ठामपणे फेटाळून लावत पलटवार केला आहे. महसुली प्रकरणांचा प्रचंड वाढता ताण लक्षात घेऊन आठवड्यातून तीन दिवस सुनावण्या घेतल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक सुनावणीत २० ते २५ प्रकरणेच ठेवली जातात आणि पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी पुरेसा वेळ दिला जातो, असेही त्यांनी सांगितले. मात्र, काही प्रकरणांमध्ये वकील पत्र सादर न करताही निर्णय देण्यासाठी आवाज चढवून दबावतंत्र वापरले जात असल्याचा गंभीर आरोप तहसीलदारांनी केला आहे. ङ्खमी नेहमीच वकिलांना सहकार्य केले असून माझ्या कामाचे ज्येष्ठ वकिलांनी कौतुकही केले आहे. पण काही लोक जाणीवपूर्वक मिठाचा खडा टाकून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत,फ्रअसा दावा त्यांनी केला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८